## -: प्रकरण १ ले :-

## आगरकपूर्व व आगरककालीन सामाजिक, राजकीय आणि वाङ्‌मयीन परिस्थिती.

### प्रस्तावना :-

इ.स.१८१८ ला पेशवाईचा अंत झाला. आणि ब्रिटीशांचा युनियन जॅक, शनिवार वाड्यावर आकाशापर्यंत नाचण्याच्या पद्धतीने फडकत परि- वर्तनाच्या कामी सज्ज लागला. व इंग्रजी राजवट ख-या अर्थाने सुरु झाली. १९ व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकापर्यंत बहुतेक संपूर्ण देश इंग्रजांच्या अंमलाखाली आला. राजकीयदृष्ट्या १८१८ हा परिवर्तनाचा काळ मानला जातो. परंतु वाङ्‌मयीनदृष्ट्या १८०० पासून मराठी वाङ्‌मयाच्या निर्मितीला ख-या अर्थाने सुरवात झाली. १९ व्या शतकातील मराठी वाङ्‌मयाचा इतिहास म्हणजे इंग्रजांच्या राजवटीमुळे पाश्चात्य संस्कृतीच्या सहवासात महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये झालेल्या घडामोडींचा व प्रचंड उलथापालथीचा इतिहास होय. या उलथापालथीमधून संपूर्ण महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. पारंपारिक कल्पनांना प्रचंड धक्का बसला. या धक्क्याने महाराष्ट्रीय संस्कृतीला भराभर तडे गेले. महाराष्ट्रीय समाज खडबडून जागा झाला. त्याचे डोळे दिपले. पूर्वीपेक्षा वेगळे काही तरी पाहतो आहोत, अनुभवतो आहोत याची जाणीव झाली आणि पारतंत्र्याची जाण येण्यास सुरुवात झाली. १९ वे शतक म्हणजे महाराष्ट्रीय संस्कृतीला मिळालेले एक वेगळे व निर्णायक वळण ठरले. हाच तो पूर्व संस्कृतीचा क्रांतिकारक काळ. मराठी वाङ्‌मय ख-या अर्थाने लिखित व मुद्रित स्वरूपात लोकांच्या समोर आले. तो काळ होय.

### मराठी वाङ्‌मयाचा उदय :-

मराठी साहित्यातील व्याकरण, निबंध, कविता, कथा-कादंबरी, चरित्र-आत्म चरित्र, नाटक, टीका, इ.वाङ्‌मय प्रकार स्वतंत्ररित्या याच

काळात उदयास आले. आणि विकास पावले. या वाङ्‌मय प्रकाराचा प्रचार व प्रसार होण्यासाठी साधन म्हणून [illegible]मराठी मुद्रणालयांचा उदयही याच काळात झाला. मराठी साहित्य वाढले पण नासले. त्या काळातील मराठीला आधुनिक मराठीचे प्रगल्भ स्वरूप लाभले नसले तरी सुरवातीचा हा काळ म्हणजे मराठी वाङ्‌मयाचा उषःकाल होता. प्राथमिक अवस्थेत अनेक इंग्रजी, संस्कृत, फारसी, अरबी, अनुवादीत साहित्य निर्माण झाले. ती स्वतंत्र अशी निर्मिती नसली तरीही मराठी वाङ्‌मयाला चालना मिळण्यासाठी तो एक जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न होता.

## भाषांतरयुग :-

इ.स.१८०० ते १८७४ हा मराठीच्या पूर्व तयारीचा कालखंड ठरला. याला "[illegible]" किंवा "भाषांतरयुग" असेही मानतात. कारण याच काळात बरेच वाङ्‌मय हे अनुवादित होते. आणि बहुतेक इंग्रजी साहित्यानुवादित होते. मराठी वाङ्‌मयाला स्वतंत्र, स्वतःची विशिष्ठ अशी परंपरा नव्हती. आणि अल्पावधीत वाङ्‌मयनिर्मितीसाठी भाषांतराखेरीज दुसरा पर्याय नव्हता. कारण तिथे प्रतिभेची आवश्यकता नव्हती आणि सोईस्कर मार्ग सोपा होता. यापूर्वीच्या काळात ही भाषांतराची कल्पना कुणाला नव्हती. ती या काळातच मान्यता पावली आणि त्यामुळेच प्रचंड प्रमाणात विविध वाङ्‌मय प्रकारातील अनुवादित साहित्य निर्माण झाले स्वतंत्र निर्मितीपेक्षा ही अनुवादक निर्मितीच अधिक झाल्याने या वाङ्‌मयीन युगास "भाषांतरयुग"म्हटले गेल्यास ते स्वाभाविक होते.१

## साम्यावस्थेचा काळ :-

या कालखंडास कुणी काहीही म्हणो. परंतु बुध्दिनिष्ठ दृष्टीने साहित्य क्षेत्रात विचारपूर्वक व निर्धारपूर्वक टाकलेले पाऊल म्हणून या काळाचा निर्देश करावा लागेल. म्हणूनच इतरांच्या मदतीने का होईना मराठी वाङ्‌मयात चालना मिळाली. हे नाकारता येत नाही. कारण कांही धार्मिक

संतवाङ्.मय वगळता मराठी वाङ्.मयाला दुसरी परंपरा किंवा पूर्वेतिहास नव्हताच मुळी. अर्थात भाषांतर हे ओघाने आले. स्वतंत्र व प्रतिभासंपन्न वाङ्.मय निर्मितीच्या दृष्टीने या वाङ्.मयाला महत्व नसले तरी मराठीच्या विकासाच्यादृष्टीने " भाषांतरांचा काळ" म्हणून हा टप्पा अपरिहार्य म्हणून महत्वाचा ठरतो. किंबहुना पुढील मराठी वाङ्.मयाच्या इतिहासाची नांदी ठरतो.

<u>शैक्षणिक परिस्थिती व वाङ्.मयाची दुरावस्था :-</u>

मराठी भाषेला राजाश्रय नव्हता. यापूर्वी समाजव्यवस्थेमध्ये विद्या शिकणे केवळ ब्राम्हणानाच शक्य होते. ब्राम्हण वगळता इतर वर्गाच्या लोकांना विद्या शिकण्याचा अधिकार नाकारल्याने बहुसंख्य समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला. ब्राम्हणी राज्यवटीत संस्कृत भाषेचाच उदोउदो होत असल्याने मराठी भाषेला राजाश्रय नसल्याने व बहुसंख्य बहुजन समाज विद्यार्जनापासून अलग पडल्याने मराठी भाषा केवळ व्यवहाराचे साधन म्हणून अस्तित्वात होती. आणि यामुळे मराठीची अवस्था केविलवाणी झाली. परिणामी बहुजन समाज अधिकच अज्ञानी बनत गेला. याज्ञिकांची चौकट अधिकच बळकट होत गेली. संस्कृत वैदिक ग्रंथ, त्याचे निरुपयोगी अर्थहीन पाठांतर, पंडिती व संतांची भाषा, बुवांना श्रीरामोठाचा आश्रय आणि त्याकाळात शिक्षणाची गरज भागविली जात होती. शिक्षण ही बाब चैनीची मानल्याने बहुजन समाजांशी त्याचा दुरान्वयानेही संबंध नव्हता. संत वाङ्.मय म्हणजे समाजाचा मानदंड असले तरी त्यात नवचैतन्य नव्हते. ते तोंडपाठ स्वरूपात राहून त्यावर पारमार्थिकतेची दाट छाया पडली होती. ऐहिकता लोप पावली होती. मध्ययुगीन संस्कृतीला इंग्रजी संस्कृतीचा सहवास लाभल्या-बरोबर अल्पावधीतच अनेक स्थित्यंतरे होऊन मराठी वाङ्.मयाला एक निर्णायक वळण मिळाले.

## मध्ययुगीन रुढी व मेरलमुली :-

इंग्रजांची राजवट सुरु झाल्यावर इंग्रजांनी स्वदेशियांकरिता शाळा सुरु केल्या. या शाळांमधून शाळेत शिक्षण मिळत असत. तेव्हा तेथे मुलांना पाठवावे की नाही हा प्रश्न पडे. शाळेत मुलांना [ मुलींना शाळेत पाठविण्याचा विचार त्यावेळी स्वप्नातही आला नव्हता] पाठविल्यावर धर्म रक्षणासाठी बराच त्रास होईल. owl, beaf या सारखे शब्द पाठ करणे किंवा त्याचे उच्चारणेदेखिल अधर्म मानले जाई. यामुळे पुष्कळ असलेले पुस्तक घरी ठेवत नसत. शाळेतून घरी आल्यावर लगेच स्नान करावे लागे.२ वेदोक्त ग्रंथातला अक्षर कागदावर छापणा तरी तो विटाळला जाऊन लोकांच्या भावना दुखावत असत.३

धर्म ज्ञान काय ते संस्कृत ग्रंथात साठवलेले आहे आणि त्यातील विद्या काय ती ब्राम्हणांनीच शिकावी इतरांना तो अधिकार नाही. श्रीमंतांनी घरी बसून खावे, कशाचाही उद्योग करु नये, केल्यास तर खानदानी-पणाला बट्टा लागतो. शिकणे ही श्रीमंतीला किंवा खानदानीपणाला कमी-पणा आणणारी बाब होती. धर्मकर्म करावयाचा तो ब्राम्हणांना. इतरांना नाही. जो ब्राम्हण नाही तो त्याच्या देवळातही यात्रा नाही. असा ब्राम्हण वर्चस्वाच्या कल्पना ब्राम्हणात तर बलवान होत्याच, पण ब्राम्हणेतर जातीही या समजाने पछाडलेल्या होत्या ४ मुलींना आठवे वर्ष लागण्याच्या आतच तिचे लग्न उरकून टाकण्याची धडपड व नवऱ्याच्या मांडीवर बसविण्याचा प्रकार याच्यामुळे समाजाची अधोगती होऊ लागली होती. लोकहितवादींचे लग्न बाराव्या तेराव्या वर्षी झाले होते. त्यांच्या पत्नीचे वय अवघे चार तर ४ वर्षांचे होय रीत सर्रास रूढ होती. वृद्ध-बाला विवाहात कुणालाच काही वाटत नव्हते. वृद्ध नाना फडणीसांची शेवटची पत्नी [त्यांनी सतरा नऊ लग्ने केली] मुसलमानी मनीप्रमाणे नाना " कबरीत " गाडले गेल्यावर "अकरीत" आली नानाचे मृत्युसमयी ती अवघी नऊ वर्षांची होती.५

राजाची वेठबिगारीच्या [illegible] शारीरिक श्रमांचा कुणीच निषेध करीत नव्हते. किंवा अस्पृश्यांच्या छळाबद्दल कुणी काही विचारत नव्हते. तसे कुणाचे धाडसही नव्हते. उलट ब्राह्मणांनी, मोठमोठ्या भट राजाचीच व अस्पृश्यांची स्तोत्रे गात होते. अंमलदार असो मोठेपणाचे लक्षण मानले जाई. सावकारांच्या किंवा कलावंतिणींना एक दोन सखे इतिहास दिली मक्तेदार अनेकांना भूषणावह वाटे. राजांचे सारे नाटके ही वेगळी कमान मर्यादा होती. कलावंतिणीच्या घरात देऊळ किंवा देऊळ कलावंतिणीच्याकडे नाचण्याने राहिले तर बिघडले कुठे? असा अनाचार सर्वीकडे तर होते? बाजूने वाढला होता. जसे च ठिकाणी पाणी शिंपले, असे देवा हरवाय पुढे, नागोबाला नैवेद्य व गार्हाण असे प्रकार लोक करीत. सरकार मिळविण्याच्या पेशीत ५० माणसे निघून जावसी कधून जाणारी व जाऊन त्यास ओढणारी असत. व याचे त्यांना काहीच वाटत नसे. मिशनरी व परदेशीयांची भटांना कुठ कळे हाच धर्म होता. उच्चवर्णीय सदर असे होते. कारकुनाशिवाय त्यांचे काहीही काम नसे. न्याय अन्यायाची चाड राहिली नव्हती. शिवाय, जाति, ब्राह्मण, क्षत्रिय, ब्राह्मण, विविधतेचा म्हणून दिशाहीन व दैववादी बनून समाज हे सर्व भोगत राहिला होता.

**मध्ययुगीन सामाजिक व राजकीय परिस्थिती :-**

प्राचीन भारतावर अनेक राष्ट्रांनी टोळ्यांनी आक्रमणे केली. ज्या परकीय शक्तींनी प्राचीन भारतावर आक्रमणे केली, ते इथल्या संस्कृतीशी कालांतराने एकरूप होऊन गेले. त्यात मोंगल साम्राज्याचा वरचष्मा दीर्घ काळ राहिला. मोंगल भारतात जवळ जवळ १२०० वर्षे राहिले. ही मुस्लिम लोक विलासी व ऐश आरामी संस्कृती होती. त्यांच्याकडेच सत्ताधारी नव्हता? ते भारतीयांना सत्ताधारी बनून देणार? उलट त्यांनी जिझिया करासारखे कर लादून भारतीयांवर अन्याय, अत्याचार केले, भारतीयांच्या मालमत्तेचा व अंतर्गत दुहीचा फायदा घेऊन या परकीय राज्यकर्त्यांनी आपले साम्राज्य भारतात पसरले. यानंतर पुढे इंग्रज भारतात व्यापार घेऊन व्यापाराचे

निमित्त काढून आले. येथील परिस्थितीचा त्यांनी अंदाज घेतला. मुघल बादशहादाराचा वरद घेऊन आलेल्या इंग्रजांनी इथल्या परिस्थितीचा फायदा घेऊन आपले बस्तान बसवून सर्व राज्यकारभार हाती घेतला. अर्थात इंग्रजांची सत्ता स्थिर करण्यात हिंदू व्यापारी व सावकार यांनी ब्रिटिशांना साहाय्य केले. बंगालमधील मुस्लिम घराण्यातील पेढीवाल्यांनी हिंदुस्थान जिंकण्याला ब्रिटिश व्यापारी राज्यकर्त्यांना मदत केली ती याची ब्रिटिश राज्यकर्ते विसरले नाहीत, तशी ती हिंदी लोकांनाही विसरता येणार नाही.[7] आमची धर्मनिष्ठा अशी हीन आणि संकुचित बनली होती, स्वकीय व परधर्मीय राज्यकर्त्यांकडून आमच्या लोककल्याणात हात घालणार नाही आणि आमची मंदिरे पाडणार नाहीत असे अभिवचन घेऊन त्यास साहाय्य करण्यास आम्ही तयार होतो.[8] परकियांची इंग्रज राजवट आमच्या हाताने आम्हीच बळकट केली.

हजारो मैलांचा सागरी प्रवास करून त्यांनी देश घेऊन राज्य केले. आणि त्याचवेळी कूपमंडूकवृत्तीने राहणारे, बहुजनांस निकृष्ट मानणारे धार्मिक कल्पना उराशी बाळगून, त्यांचा डांगोरा पिटणारे, स्वतःला श्रेष्ठ समजून, खोटा गर्व बाळगून सामान्यांना छळणारे ब्राह्मण-भट-भिक्षुक त्यांच्या बोजाखाली निमूटपणे राहणारा ब्राह्मणेतर समाज हा स्वतःच विणलेल्या आत्मनाशाच्या जाळ्यात अडकून पडला होता. मराठ्यांची अस्मिता जागवणारा, मोगलांशी निकराने झुंज देणारा राजा शिवछत्रपती हे संपल्यानंतर काही काळ शांत होऊन भोसले भाऊ ब्राह्मणी वर्चस्वाचा अंमल सुरु झाला. जाती धर्मांना ऊत आला. अनेक धार्मिक रिती व रूढींना मान्यता प्राप्त होऊन अर्थ मावळला. त्याच धर्म बुवांच्या घेऊन सर्व समाज अंधःकाराच्या खोल अज्ञानाने पछाडलेला होता. मोगलांच्या भोगविलासी व ऐष आरामी जीवनाची अनुकरणे त्यांच्या राज्यकर्त्यांत व त्यांच्या अनुयायांत रोमरोमात भिनली होती. त्यामुळे साहजिकच बाग-बगीचे, नाच-गाणे, अंबारी, बनावाजा, इ. मोहटींना ऊत आला होता. स्वार्थीवृत्ती, स्वैराचार, अनैतिकीकरण व पराक्रम यांची फारकत झाली होती. स्वराज्य नष्ट झाल्यामुळे शिपाईगिरी संपली होती. त्यामुळे

पूर्वापार चालत आलेल्या वतनावर आणि पूर्वी कधी तरी कानाने ऐकलेल्या वाग्दानावर आळशी पणाने उपजीविका चालवत होता. पठाणी सत्ते व बादशहांच्या जुती चाटून हजारो लाचे बंद करून आपले शोक करीत होते.९ कुलीन म्हणविणाऱ्या कंटकप्राय नादान सरदारांना, बुद्धिभ्रष्ट ब्राह्मणांना इनामे व वतने दिले गेले होते. समाजाची आत्मिक उन्नती ज्यांनी साधावयाची असा ब्राह्मण वर्ग स्वतःचा आत्मा हरवून बसला होता. ज्या वर्गाने समाजाचे संरक्षण करावयाचे तो वर्ग दुर्बल व निष्काम झाला होता. ज्या वर्गाने समाजाची अर्थव्यवस्था सांभाळावयाची त्याच्या हाती काहीच नव्हते. कारण इथला कच्चा माल इंग्रज आपल्या मायदेशी लुटून नेऊन पक्का माल आणीत होते. शिवाजीच्या संततीपासून ब्राह्मणांची विद्या व क्षत्रियांचे शौर्य संपले हे आम्ही स्वाभिमानाच्या भरात विसरलो.१० म्हणून समाज हा दिशाहीन झाला होता. शूद्रातिशूद्र ह्या वरील वर्गांची सेवा करता करता मेटाकुटीला आला होता. त्यांना कुणी वाली नव्हता. परिणामी "याची देही याचि डोळा" राज्य बुडतांना असहायपणे पहाणे त्यांच्या नशिबी आले होते.

इंग्रज इथे येईपर्यंत धार्मिक क्षेत्रात बजबजपुरी, सामाजिक क्षेत्रात जातीभावना व वैयक्तिक जीवनात निरर्थक रूढी आणि अंधश्रद्धा यांचे वर्चस्व अबाधित राहिले होते. व्यापार उद्योगाला गती नव्हती. साध्या साध्या व्यवहारोपयोगी वस्तू परकीयांकडून विकत घेतल्या जात. त्या इथे तयार करण्याची कोणालाही कल्पना नव्हती. वैयक्तिक धर्मनिष्ठ व हांजी हांजी करणारी स्वामीनिष्ठा हे गुण वाखाणले गेले, व त्यालाही सामुहिक अधिष्ठान नव्हते. त्याकाळच्या एकंदर हिंदुस्थानातील हिंदु समाजाकडे पाहिले असता यांच्यात स्वाभिमान, स्वामीनिष्ठा, धर्मनिष्ठा, शौर्य, धैर्य वगैरे गुणसंपत्ती भरपूर असूनही राष्ट्राभिमान कुठेच नव्हता.११ धर्मनिष्ठेतही खऱ्या धार्मिकतेपेक्षा धर्मभोळेपणा शास्त्रापेक्षा रूढीचे स्तोम कर्मकांड, जंतरमंतर, जारणमारण, अनुष्ठानापासून यावर विशेष भर दिला जात होता. अज्ञान आणि मागासलेपणामुळे संरक्षणाची जबाबदारीही परकीयांच्या हातात

गेली होती. पेंढारी लुटारूंचा धुमाकूळ माजला होता. अस्थिर राजवटीमुळे कमालीचे शासनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले होते.

<u>नवी पाश्चात्य संस्कृती :-</u>

इंग्रजी राजवटीमुळे ऐहिक सौख्य, सर्वधर्म समभाव, एकेश्वरवाद, आर्थिक विकास, बुद्धिप्रामाण्यवाद, समता व बंधुता या मूल्यांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले होते. मानवतावादामुळे नवी जाणीव निर्माण झाली. उदारमतवाद व लोकशाहीचे नवे वारे वाहू लागले. सामान्य व शोषित वर्गाला स्वतःच्या हक्काची जाणीव निर्माण होऊ लागली. शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली होऊ लागली. लोकशिक्षणाची जबाबदारी सरकारची बनली. श्रद्धायुगाचा अंत होऊन बुद्धियुगाचा उदय झाला. सामाजिक न्यायबुद्धी व नियमांचे पालनाची एक नवीदृष्टी समाजाला लाभली.

<u>इंग्रजी राजवटीचे स्वागत :-</u>

सर्व कुव्यवस्थांशी व केवळ व्यापाराचे निमित्त काढून येथे आलेल्या इंग्रजांना व त्यांच्या राजवटीस स्वीकारण्यात व यातील स्वदेशीय समाजातील अनेक घटकांनीच साहाय्य केले. राजवटी व अराजकाच्या अव्यवस्थित व जुलमी राजवटीला कंटाळलेला समाज सुव्यवस्थित राजवटीकडे कौतुकाने व आदराने पहात होता. पाश्चात्यांच्या ओढीने, आपुलकीच्या भावनेने अधिक ओढा घेत होता. स्वकीय बेशिस्त व अन्यायी राजवटीच्या तुलनेने इंग्रजांच्या सुव्यवस्थित व सुनियंत्रित राजवटीस नोकरीची भुरळ व ही नोकरी मिळविण्यासाठी परकीयांचा ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची सुद्धा तत्कालीन अनेक सुसंस्कृत लोकांना पडली होती. " लोकांचा धर्माभिमान न दुखावता पोटास दिले म्हणजे झाले, मग तो आपला बाप असला तरी त्याच्यावर देखिल बंड उभारण्यास मागे पुढे न पाहणाऱ्या[12] स्वदेशीयांस " इंग्रजांनी पैशाने बांधले होते.व विनासायास राज्य पदरात पाडून घेतले होते. शिपाईगिरी करणारे मराठी जवान निकामी झाले, शेतीवर आणखी ताण

सत्य नव्हते, मग आज नव्याच्या केशरींशी करावे तरी काय ! समकीकडे मोंगल आणि अफगाणस्थान. आणि अशावेळ आज रितीने पोखरता मेल्याने इंग्रजी अंमल तत्कालीन लोकांना हितकारक वाटला. हिंदूंना दुसरा कोणताही अंमल त्यांनी राजीखुशीने स्वीकारला असता, इतके ते मराठी स्वराज्याला विटलेले असल्याने इंग्रजी अंमलाचीच त्यांना गोड वाटला. तिला ते धुळे वाट आश्चर्य वाटले !१३.

वेळीच लोकांचा मानसशास्त्र व आकांक्षा पाहून कंपनी सरकार साम्राज्यवादी नावाने वाढवून असलेल्या इंग्रजांनी आपले धोरण पत्करले. इंग्रजी राज्यवट लोकशाही प्रधान असली तरी तिचा भारतातील अवतार मात्र वसाहतवादीच होता. कच्चा माल व संपत्तीची लूट करून करावी आणि पक्का माल व [ख्रिश्चन] धर्म इकडे आयात करावा असाच पद्धतशीरपणे व नियोजनपूर्वक प्रयत्न इंग्रजांनी केला. आमच्या इकडच्या सुशिक्षित लोकांना ब्रिटीश तत्ववेत्त्यांनी भुरळ पाडली होती आणि आमच्या वर्गाची लूट ब्रिटीश मुत्सद्यांनी व व्यापाऱ्यांनी चालवली होती ही "लूट" लोकसेवेच्या आणि लोकहिताच्या वेषाने नटलेली होती.१४ साम्राज्यशाहीत वेगळे पोषक म्हणून त्यांनी करता येईल ते केले. विशाल भूखंडात पसरलेला भारत विविध धर्म-भाषा, भौगोलिक परिस्थिती, इंग्रजांचे सुधारणेचे येथील उलटसुलट चालू इंग्रजांचे महत्वाच्या शहरातील वास्तव, वसाहतीमुळे त्यांनी समाजात निर्माण झालेले उलटसुलट मतप्रवाह आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे निर्माण झाली. यातून "सुधारक" हा एक नवीन वर्ग उदयास आला. अर्थात या वर्गांना निंदाव्यंजक अर्थ प्राप्त झाला होता. "सुधारलेला या शब्दाची व्याख्या, जातीचे आचार मोडणारा, मद्य-मांस खाणारा व बोधाची उडणारा" अशीच लोकांची समजूत झाली.१५ काही ठिकाणी इंग्रजांचे व त्यांच्या धर्माचे अनुकरण तर काही ठिकाणी इंग्रजी संस्कृती व धर्माविरोधी भूमिका निर्माण झाल्या. त्यातून परस्परविरोधी संभ्रमय वातावरण निर्माण होऊन त्याचे पडसाद समाज जीवनाच्या सर्वांगीण घटकावर उमटले. वाङ्मयातही याचे प्रतिबिंब उमटले.

ब्रिटीश राजवटीने येथील समाजाला एकदमच अनेक, [illegible]
आणल्या, कायदा-सुव्यवस्था, शांतता, सुधारणा, आधिभौतिक संस्कृतीचा परिचय, जीवनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन, मानवतावाद व जाती विरहित समाजरचना इ. गोष्टी प्रदान केल्या व त्याचा प्रसारही झपाट्याने झाला. अनेक वर्षांपासून धार्मिक लोकांच्यावर धर्मसत्तेचा पगडा असल्याने व त्यांनाही पुरस्कार केल्याने सुशिक्षित- अडाणी, राज्यकर्ते-प्रजा, अस्पृश्यसमाज व उच्च वर्गीय समाज, सनातनी-सुधारक, इ. अनेक द्वंद्वांना या राजवटीने जन्म दिला. याचे पडसाद इंग्रजांच्या पद्धतीने वाढीस लागलेल्या व वृध्दींगत झालेल्या वाङ्मयात पडून वाङ्मय निर्मितीला वेगळेच असे आकार येऊन विविध विचार प्रवाह अस्तित्वात आले. त्यातील प्रमुख विचार प्रवाही वाङ्मयात आपली वाटचाल कधी अडखळत, तर कधी सुसाटपणे वाहत कधी थांबत करू लागला.

पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणाने व इंग्रजी शिक्षण-पद्धतीच्या धर्म प्रसाराच्या धोरणामुळे एतद्देशीय संस्कृतीला नवे वळण मिळाले. पाश्चिमात्य शासन व्यवस्था, सामाजिक मूल्ये, वाङ्मयीन साहित्य व विचार, शिक्षण पद्धती, मुद्रणव्यवस्था, वृत्तपत्रे, ग्रंथ, धर्मादि कल्पना या बाबतीत नवीन कल्पनेची ओळख एतद्देशीयांना झाली व या नवीन कल्पनांशी तुलना करता एतद्देशीयांना स्वतःच्या संस्कृतीची [illegible] प्रकर्षाने जाणीव निर्माण झाली. त्यामुळे, पारंपारिक साहित्य व कला मूल्यांचे कमी-अधिक प्रमाणात या सगळ्या स्वीकारल्याकडे वळण्याकडे व संवर्धन करण्याकडे जाणीवपूर्वक प्रयत्न झाला. सर्वस्वी पाश्चात्य साहित्य व संस्कृतीच्या निकषावर एतद्देशीयांनी आपले साहित्य व संस्कृती मूल्ये, कला व जीवन मूल्ये जाणीवपूर्वक तपासण्याचा प्रयत्न केला. याचवेळी पारंपारिक प्रतिगामी व्यक्तींनी पुरोगामींना पाहून विरोधही केला. कदाचित आपल्या वर्णाश्रमाच्या उच्च स्थानाला व ऐहिक हितसंबंधांना बाध येईल याची जाणीव झाल्याने असा वर्ग विरोधात

टाकला. या संघर्षमय वातावरणात मराठी वाङ्मयाच्या निर्मिती प्रक्रियेस वेगाने सुरुवात झाली. परकीय लोकांना स्वार्थी हेतूने का होईना, परंतु मराठी साहित्य उत्तेजनार्थ शब्दकोशांना प्रवृत्त करून वाङ्मयातले निर्माण करून त्यांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. संत, पंत व तंत काव्य यांच्या धार्मिक व पारमार्थिक चौकटीत अडकलेल्या मराठी भाषेला मुक्त करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला. मराठीच्या अभ्यासात शिक्षण व्यवहारात योग्य स्थान मिळावे, ती अधिकाधिक शुद्ध व्हावी, पोषक व्हावी, तसेच अनेक साहित्य प्रकारांने समृद्ध व्हावी या हेतूने त्या कालातील समाजातील कर्त्यापुरुषांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे.

## विविध अंगांनी वाङ्मय निर्मिती :-

सुरुवातीला परकीय इंग्रजांचे ध्येय भारतात सर्वत्र आपली सत्ता प्रस्थापित करणे व ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे हेच होते. हे करीत असताना यासाठी त्यांना स्थानिक लोकांना हाताशी धरणे क्रमप्राप्त होते. स्थानिक लोकांपैकी ब्राह्मण हाच वर्ग शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेला होता. शिवाय या वर्गाचे वर्चस्वही इतर बहुसंख्य समाजावरही होते. त्यामुळे या लोकांच्या मनात इंग्रज राज्याविषयी आदर निर्माण झाला. त्यांना हाताशी धरून आपल्या कार्याचा प्रसार इतर बहुजन समाजात करणे क्रमप्राप्त वाटले असावे. स्थानिक आपली लोकांना थोडेफार शिक्षण देऊन, त्यांच्या कोणत्याही धार्मिक व पारंपारिक चौकटीत ढवळाढवळ न करता शिक्षण प्रसार करावा त्यामुळे शिक्षणाच्या प्रसाराबरोबर येथील जनता ख्रिस्ती धर्म स्वखुशीने पत्करील असा राज्यकर्त्यांना विश्वास वाटत होता.[१६] यामुळे आपले राज्य व धर्म प्रसारण कामी म्हणून का होईना मराठी भाषेच्या ग्रंथनिर्मितीस सुरुवात झाली. इंग्रजांनी स्थानिक पंडित वैजनाथशास्त्री सारख्या शास्त्री पंडिताकडून सिंहासन बत्तीशी (१८१४), पंचतंत्र (१८१५), हितोपदेश (१८१५), राजा प्रतापादित्याचे चरित्र (१८१६), रघुजी भोसल्यांची वंशावळी (१८१६), यासारखी पुस्तके लिहून घेऊन ती छापली. मराठीतील पहिले पुस्तक छापण्याचा मान

डॉ.केरीसारख्या मिशन-याकडे वळतो. त्याने मराठीतील पहिला "मराठी कोश" छापला. तसेच पहिले मराठी व्याकरणही त्यानेच तयार केले. म्हणजे अव्वल नव्या सांस्कृतिक घडामोडींच्या प्रवर्तनाचे श्रेय मिशनरी मंडळींकडेच जाते.१० इंग्रजी शिक्षण घेतलेली व त्या शिक्षणा-मुळे प्रभावीत झालेली स्वदेशीय नवी पिढी निर्माण झाली. याच पिढीतील लोकांकडून इंग्रज मिशन-यांनी अनेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे करवून घेतली. कांही कोश लिहून घेतले. कांही व्याकरण ग्रंथ तयार करवून घेतले. तर कांही [illegible] नीतिबोधपरक अशा स्वरूपाचे कांही ग्रंथ करवून घेतले. भाषांतरीत ग्रंथांना उत्तेजन देण्याचा आग्रह करून "दक्षिणा प्राईज कमिटी" सारख्या संस्थेने ग्रंथ निर्मितीला हातभार लावला. कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, मोरो सदाशिव मेले, गंगाधर रामचंद्र टिळक इ. शास्त्री पंडितांनी अनेक भाषांतरीत ग्रंथ लिहिले. बापू छत्रे व हरी केशवजी हे मुंबईतील सरकारी नोकरही या ग्रंथ निर्मितीच्या अग्रभागी राहिले. यापुढे हेच कार्य भाऊ महाजन व बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरु ठेवले. अव्वल इंग्रजीच्या काळात नव्या पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव पडलेली नवी पिढी निर्माण होऊन शिक्षणाचा विविध अंगाने प्रसार होऊन जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन निर्माण झाला.व त्याचा परिणाम म्हणून विविध प्रकारची वाङ्‌मय निर्मिती झाली.

बाळशास्त्री जांभेकरांनी "दर्पण" (१८३२) हे पहिले मराठी-इंग्रजी वृत्तपत्र सुरु करून वृत्तपत्र लिखाणाचा पाया घातला. भाऊ महाजनांनी तर वृत्तपत्रीय लिखाण करून एक नवी सामाजिक दृष्टी समाजाला दिली. लोकहितवादींनी सामाजिक बांधिलकीतून व लोकहिताच्या कळकळीतून लिहिलेली शतपत्रे, महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या कल्याणासाठी आंतरिक तळमळीने लिहिलेले स्फुट समाजाभिमुख लेख वाङ्‌मय, दादोबा पांडुरंग यांचे व्याकरण व आत्मचरित्र, विष्णुबुवा ब्रह्मचारींचा हिंदूधर्म व राज्यपद्धतीच्या नवीन दृष्टीकोनातून अनुसरून

लिहिलेला निबंध, बाबा पद्मनजींचे आत्मचरित्र " अरुणोदय " व "यमुनापर्यटन " ही विधवा समस्येवर प्रकाश टाकणारी व ख्रिस्तीधर्म प्रसाराच्या हेतूने लिहिलेली कादंबरी, लक्ष्मणशास्त्री हळबे यांची "मुक्तामाला" ही अद्भुतरम्य कादंबरी, विष्णुशास्त्री चिपळूणकरांची वैचारिक व स्वराज्यनिर्मितीचा पाया घालणारी निबंधमाला. हरीभाऊ आपटे यांच्या सामाजिक समस्या मांडणाऱ्या सामाजिक कादंबऱ्या, सर्व प्रकारची माहिती देण्याच्या हेतूने मोरोबा कान्होबा विजयकरांनी लिहिलेली "घाशीराम कोतवाल" ही माहितीपर कादंबरी कृ.बा.मराठे यांनी " नाटक व नाट्य " या निबंधाद्वारा समीक्षेबाबतचा सांगितलेला नवा दृष्टीकोन, नाट्यमन्वंतर घडविणारे विष्णुदास भावे, मराठी कवितेला, क्रांतिकारक वळण देणारे कवी केशवसुत, समाजसुधारणेचे अग्नी म्हणून ओळखले जाणारे न्यायमूर्ती रानडे, सरकारी नोकरीचा त्याग करून क्रांतिकारक सामाजिक सुधारणांचा व स्वातंत्र्याचा हिरीरीने पुरस्कार करणारे योद्धा गोपाळ आगरकर, स्वराज्यासाठी आपले आयुष्य झोकून देणारे लोकमान्य टिळक इ. अनेक व्यक्तींनी मराठी भाषा वाङ्मयास आपआपल्या परीने भर घातली व मराठी वाङ्मय उर्जित अवस्थेत आणण्याच्या दृष्टीने आपापल्यापरीने सहयोग दिला. यामधील कांहींनी समाजाची, धर्मांधळे व संसारात निरर्थक रूढीपासून सुटका व्हावी म्हणून, कांहींनी जातीभेद नष्ट व्हावे म्हणून आणि समता प्रस्थापित व्हावी म्हणून, कांहींनी दुरावलेल्या व स्त्रीवरील अन्यायकारक विचारांना वाचा फुटावी व वास्तववादी दृष्टीकोन स्वीकारावा म्हणून, कांहींनी समाजाला नवीन राष्ट्रीय दृष्टीकोन मिळावा म्हणून, कांहींनी ख्रिस्ती धर्म प्रसाराला चालना मिळावी म्हणून, तर कांहींनी ख्रिस्तीधर्म प्रसाराला आळा घालण्याच्या दृष्टीने विरोध म्हणून, कांहींनी नोकरीतील कर्तव्य म्हणून, तर कांहींनी सामाजिक बांधिलकी म्हणून अशा अनेक विध दृष्टीकोनातून व हेतूने विविध प्रकारचे साहित्य निर्माण करून पुढील मराठी वाङ्मयाचा पाया घातला व त्याचबरोबर स्वतंत्र भारत देशाच्या निर्मितीच्या इमारतीचा पायाही भक्कम केला. यामुळे १९व्या शतकातील थोर लेखक, कवी, राजकारणी, समाजसुधारक,

यांचे कर्तृत्व म्हणजे परंपरागत रुढी, परंपरा व संस्कृती यांचे जोखड फेकून देण्याचा प्रयत्न आणि वास्तववादी व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टी - कोनाचा जाणीव पूर्वक स्वीकार होय.

आत्मपरीक्षण व पुनरुत्थानवादी दृष्टीकोन :

इंग्रजी शिक्षण, संस्कृती व राजवट यामुळे प्रभावित झालेल्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात तरी ही राजवट म्हणजे एक ईश्वरी वरदान आहे, किंवा आपले अज्ञान नाहीसे व्हावे यासाठी परमेश्वराने इंग्रजांना इकडे पाठवले आहे. ते आपले शिक्षक, मायबाप आहेत, असा समज नव्या पिढीतील बुद्धिवाद्यांचा होता. आणि तो प्रचलित काळाचा. त्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, व आर्थिक बाबींचा विचार करता तो अनाठायी व परधार्जिण्या वृत्तीतून निर्माण झालेला नव्हता हेच दिसून येईल. कारण पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणाने इथल्या केवळ संस्कृतीचाच नव्हेतर संस्कृतीच्या सर्व अंगोपांगांना छेद दिला होता. त्यामुळे या नवीन पिढीत आत्मपरीक्षणाची लाट उसळली. त्यांच्या तुलनेने आपला धर्म, संस्कृती, साहित्य, रुढी रीतिरिवाज, राजकारण, न्याय व्यवस्था व अर्थकारण या सर्वांचे परीक्षण होऊ लागले. तौलनिक दृष्ट्या आपल्यातील न्यूनता अधिक प्रकर्षाने जाणवून त्यातून समाज - परिवर्तनाची धडपड या वर्गाने सुरु केली व धर्मासंबंधी नवजागृती, प्रबोधन, उद्बोधन व पुनरुज्जीवन यासाठी प्रयत्न केले.

मिशनऱ्यांनी ख्रिस्तीधर्म प्रसारासाठी शाळा काढणे, दवाखाने काढणे, असे पुस्तके वाटणे अशा अनेक रीतीने येथील लोकांना उपकार - बद्ध करून त्यांना आपल्या कळपात ओढण्याचा प्रयत्न केला गेला. पुढारलेल्या उच्चवर्गीय व थोड्याबहुत शिक्षित वर्गांना युक्तिवादाने वळवून व अशिक्षित वर्गांस अन्न मदत पुरवून आपलेसे करण्याचे धोरण आरंभिले. अनेक उच्चवर्गीय व दलित समाजातील लोक यामुळे ख्रिस्ती बनले. परिणामी आपल्या धर्मसंस्कृतीतील रुढी - रीतीरिवाज कठोर, निरर्थक, अन्यायी, अयोग्य असून राष्ट्रवादास हानिकारक आहेत याचा साक्षात्कार या

स्वदेशीय सुशिक्षित वर्गास होऊन त्यात जाणीवपूर्वक सुधारणा करणे आवश्यक आहे असे वाटून सुधारक वर्ग निर्माण झाला आणि त्याचबरोबर स्वधर्म व हिंदु परंपरागत संस्कृतीचा अभिमान बाळगून सुधारणावाद्यांना विरोध करणारा प्रतिगामी धर्माभिमानी वर्गही याचवेळी उदयास आला. दोन्हीही वर्गांनी आपापल्या पध्दतीने व्याख्याने, वृत्तपत्रीय लेख, निबंध इ. द्वारा आपल्या स्वमताचा पाठपुरावा केला.

दादोबा पांडुरंगांनी १८४४ मध्ये "मानवधर्मसभा" व बाळकृष्ण पांडुरंग यांनी १८४८ मध्ये परमहंससभा स्थापन केली. मूर्तिपूजा व जातिभेद निर्मूलन या दोन बाबींचा प्रामुख्याने यात विचार केला गेला. तरीही समाजबध्दपणामुळे गुप्तपणे कार्य करणारी ही सभा व तीमधील सभासदांची नावे बाहेर फुटल्याने भीतीने ती बंद पडली. बंगालमधील व भारतातील आद्यसुधारक राजा राम मोहनरॉय यांच्या ब्राह्मसमाजाच्या धर्तीवर मुंबईत न्या. रानडे, भांडारकर आदि सुधारकांनी "प्रार्थना - समाज" (१८६७) स्थापन केला. महात्मा फुले व कृष्णराव भालेकर यांनी "सत्यशोधक समाज" (१८७३) स्थापन केला. याच दरम्यान "थिऑसॉफिकल सोसायटी" ही निर्माण झाली.

पाश्चात्य शिक्षणाची खऱ्या अर्थाने ओळख प्रथम बाळशास्त्री जांभेकरांनाच पटली असे मानावे लागेल. त्यांच्या "दर्पण" व "दिग्दर्शन" या नियतकालिकांचे कार्य महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात उल्लेखनीय ठरले. हेच आधुनिक महाराष्ट्राचे आद्यजनक समजले जातात. कारण शिक्षण, राजकारण, धर्मसुधारणा, स्त्रीशिक्षण, शुध्दीकरण यांची सांगोपांग चर्चा करून सर्वसामान्य जनतेला बरोबर घेऊन वाटचाल केली. ज्या काळात छापील कागद हातात धरणे हे ओवळेपणाचे समजले जात असे त्या काळात बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या वृत्तपत्रातून समाज ज्ञानाभिमुख व सुधारणाभिमुख बनविण्याची चळवळ सुरू करून लोकशिक्षण व समाजसेवेचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण, पाश्चात्य भौतिक विद्या, जातीभेद निर्मूलन इ. बाबींविषयी विवेकनिष्ठेत चर्चा करून लोकसत्तात्मक राज्याबद्दल आपले ध्येय स्पष्ट केले होते. आपल्या

युरोपीय शिक्षणाने पुढील युरोपीय व्यवहाराचा पाया मजबूत करून मुद्रणस्वातंत्र्य व युरोपीय कार्याचा मार्ग सुकर केला. १८४१ मध्ये भाऊ महाजन यांनी "प्रभाकर" पत्र सुरु करून प्रगतीशील विचारांचे प्रतिपादन व समर्थन केले. लेखांमधी सरकारच्या धोरणातील सडेतोड टीका करून निर्भीडपणे व स्वतंत्र बाणेदार वृत्तीचे बीजारोपण केले. याच प्रमाणे लोकहितवादींनी आपली "शतपत्रे" प्रसिद्ध केली. लोकहितवादींनी हिंदुधर्मातील विशेषतः उच्चवर्णीय ब्राह्मण समाजातील अंधश्रद्धा, निरर्थक धर्मरीति, परंपरा व आळशीपणा, दांभिकपणा यावर कोरडे ओढले. काळाची पावले ओळखून भौतिक प्रगती, वैज्ञानिक दृष्टी - कोन या बाबींचा अंगिकार करून पाश्चात्य शिक्षणाचे स्वागत केले. सतत बत्तीस वर्षे "शतपत्रां"तून लिखाण करून समाजातील प्रमुख समस्यांचा विचार केला. हे करत असता कोणाचीही भीडमुर्वत न ठेवता, ब्राह्मणी वर्गाचा आरपार समाचार घेतला. अर्थात स्वसमाजाविषयी वाटणारी कळकळ व आत्मीयता याच केवळ दृष्टीकोनातून त्यांनी हे लिखाण केले. पाश्चात्य विद्या, पाश्चात्य संस्कृती, न्यायपद्धती, पाश्चात्य समाजरचना यावर त्यांची नितांत श्रद्धा असल्यामुळे आणि केवळ स्वसमाजाकडेच बोट धरविल्यामुळे लेखप्रसंगी समाजद्रोहपणाला कधी बहुत प्रायश्चित होतल्यामुळे त्यांच्या कार्याविषयी अनेकांनी शंका घेतली. अर्थात त्यांचे कार्य वादातीत मानले असले तरी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी समाजजागृतीचे केलेले कार्य नजरेआड करून चालणार नाही.

याच काळात महात्मा जोतीबा फुले (१८२७-१८८०) यांनी आपल्या कृतीने व लिखाणाने शूद्रातिशूद्र बहुजन समाजासाठी तसेच स्त्रियांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचकरपणे झोकून दिले. ब्राह्मण्या - विरुद्ध दंड थोपटून स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. मुलींसाठी शाळा काढून स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. बालहत्या प्रतिबंधक गृह काढून ते

स्त्रीउद्धाराचे मुकुटमणी बनले. विधवापुनर्विवाहाची चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला. शिवाय, अज्ञानी कुणबी शेतकऱ्यावर कुळकर्णी करणाऱ्या तत्कालीन ब्राह्मण वर्गावर, त्यांच्या दांभिकपणावर, पुरोहितगिरीवर ते आवेशाने तुटून पडले. धार्मिक व सामाजिक गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी आपले आयुष्य वेचले. म्हणून महाराष्ट्राच्या सामाजिक विकासाचे आद्य पाईक ते ठरतात. खऱ्या अर्थाने "महात्मा" पदवीस योग्य ठरतात. हिंदू धर्मावर त्यांनी कितीही टीका केली असली तरी त्यांनी धर्मांतर केलेले नाही. इंग्रजी राजवटीला जवळ करून, इंग्रज सरकारचा मायबाप, दयाळू सरकार म्हणून मानले असले तरी बहुजन समाजाची, उच्चवर्णीयांना हाताशी धरून शैक्षणिक आणि आर्थिक विकासाची कोंडी करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांचा, इंग्रज सरकारचा निर्भयपणे निषेध केला आहे. ही गोष्ट, महात्मा फुल्यांनी "इंग्रजधार्जिणे" म्हणून हेटाळणी करणाऱ्या प्रतिगाम्यांनी अजूनही ध्यानात घेतलेली नाही. त्यांच्या टीकेचा रोख ब्राह्मण जातीवर नसून वृत्तीवर होता, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते, याचे भान अनेकांना राहत नाही. हिंदू धर्मांतील विशेषतः ब्राह्मणप्रधान हिंदुसमाजरचनेवरील व ब्राह्मण-प्रधान संस्कृतीवरील त्यांचा हल्ला हा तत्कालीन ऐतिहासिक विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितीची तीव्र प्रतिक्रिया होती व ती तीव्र प्रतिक्रिया तटस्थरीतीने पाहणाऱ्या आधुनिक विचारवंतास देखील मर्यादित अर्थाने समर्थनीयच वाटेल यात शंका नाही व ती समर्थनीय आहेच.[१८]

वरील सुधारणावाद्यांना अपेक्षित असलेल्या सुधारणा न्यायमूर्ती रानडे यांनाही अभिप्रेत होत्या. त्यांनी विधवापुनर्विवाहाला तसेच सर्व सामाजिक आंदोलनाला पाठिंबा दिला या सामाजिक चळवळीला सुसंघटीत व तात्विक स्वरूप न्या. रानडे यांनीच दिले. सर्वांगीण सुधारणांकडे त्यांचे सारखेच लक्ष होते. किंबहुना सर्वच सुधारणा ह्या परस्परसंबंधी असल्याचे त्यांनी मान्य केले. १८५० नंतर रानडे

याचे कर्तृत्व सुरू होऊन राष्ट्रीय सभेच्या बरोबरीने मान मिळालेल्या सामाजिक परिषदेपर्यन्त त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याचा वाटा महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात फार मोठा आहे.

बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, भांडारकर, लोकहितवादी महात्मा फुले न्या. रानडे इ. मंडळींनी इंग्रजी विद्या, पाश्चात्य संस्कृती यांचे स्वागत केले. आणि त्यांच्या सहकार्याने आपल्या सुधारणांची वाटचाल केली.

पाश्चात्य संस्कृतीची अनावश्यक भुरळ पडून आपल्या मखेपोटी उच्च वर्गीय व दलित वर्गीयांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्यामुळे धर्मांतराच्या धोक्याची चाहूल अनेक संस्कृतीनिष्ठ विचारवंतांना लागली. अर्थात त्यांनीही काळाची चाहूल ओळखून, हिंदु धर्मातील मानवी अधिकाराची पायमल्ली करणाऱ्या धोरणांचा निषेध करून, हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कंबर कसल्या. विष्णुबुवा ब्रह्मचारी सारख्या [१८२५-१८७१] विचारवंतांनी वैदिक धर्माचे रहस्य सांगून वर्णभेदाचा निषेध केला. विद्येचा अधिकार सर्वांना आहे या मताचे समर्थन करून जाहीर व्याख्याने व वादविवादाद्वारे हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन करण्यात आणि ख्रिस्ती धर्म प्रसाराला बऱ्याच प्रमाणात आळा घालण्यात यश मिळविले. हिंदु धर्माची पाळेमुळे खोलवर रुजविण्याचा प्रयत्न केला व त्याच बरोबर सुधारक राज्यप्रकरणी निबंध लिहून समाजसत्तावादाची तरफदारी केली. आनंदाश्रम व ब्राह्मणसभा सारख्या संस्थांनीही या कामी हातभार लावला. पण एवढे मात्र निश्चित की, हिंदु समाज पाश्चात्य विद्येतील समतेची तत्वे स्वीकारण्यास उद्युक्त झाल्यामुळे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रसाराचा जोर ओसरला आणि त्याचबरोबर हेही खरे की, हिंदुसमाज रचनेत परिवर्तन घडविण्यास मिशनरी अप्रत्यक्षपणे कारणीभूत झाले.[१९]

इंग्रजी शिक्षण ही त्यावेळी एक मोठी कामधेनु होती पण त्यावेळी तिचे दोहन फक्त ब्राह्मणांनीच केले व दुर्दैवाने ब्राह्मणेतरांनी सुद्धा या महाधनाची उपेक्षा केली. त्यामुळे ब्राह्मण व ब्राह्मणेतर समाजात फार

मोठी विषमता निर्माण झाली. २० व्या पिढीत ब्राह्मणसमाज व स्वावलंबनाचा अभाव असलेला ब्राह्मणेतर समाज यांच्यातील दरी वाढत वाढून आजही ही समस्या भेडसावताना दिसते.

<u>राष्ट्रवादाचा उदय :-</u>

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला (१८७४) सुरू केली. वाङ्मयीन दृष्ट्या ती निर्णायक ठरलीच पण त्यापुढेही पुढील मराठी वाङ्मयाला ती स्फूर्तिदायक ठरून आधुनिक वाङ्मयालाही ती उत्तेजन देणारी ठरली. महाराष्ट्रीय राजकारणात एक नवीन पर्व सुरू झाले. त्यांच्या निबंधमालेने स्वातंत्र्य भावनेचे, स्वाभिमानाचे एक नवे चैतन्य महाराष्ट्रात निर्माण झाले. राष्ट्रवादाचे नवे पर्व सुरू झाले. इंग्रजी राज्य हे दैवी वरदान आहे, इंग्रज हा भारताच्या कल्याणा-साठी राज्य करीत आहे व त्या राज्यात त्यांच्या नेतृत्वाने आमचा उत्कर्ष होणार आहे ही परावलंबनाची, नामुष्कीची भावना शास्त्री-बुवांनी ठेचून नष्ट केली. आणि इंग्रज हा स्वार्थी, दुष्ट नीतीचा राजा आहे, तो भारताचे रक्त शोषण करीत आहे, त्याचे राज्य म्हणजे पारतंत्र्य असून ते नरकापेक्षाहि जास्त दाहक आहे आणि स्वातंत्र्यप्राप्ती हे भारतीयांचे पहिले ध्येय होय, हा तेजस्वी विचार त्यांनी महाराष्ट्रात निबंधमालेच्या द्वारा प्रस्तुत केला. यामुळे राष्ट्राभिमानाची, स्वत्वाची व स्वभाषाधर्माभिमानाची एक प्रचंड लाट महाराष्ट्रात उसळून आली.

याचवेळी मुंबईला आर्यसमाजाची स्थापना झाली. ॲनी बेझंट यांचा थिऑसॉफी पंथ यानंतर लवकरच महाराष्ट्रात आला आणि विवेकानंदांनी अमेरिकेत हिंदू तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करून अपूर्व विजय मिळवला, तो याच सुमारास. या सर्वांचा भारतावर अत्यंत हितावह असा परिणाम झाला. पुढच्या पन्नासेक वर्षांच्या आत भारत स्वतंत्र झाला तो याच काळात निर्माण झालेल्या चैतन्यामुळे. भारताचा राष्ट्रीय अंकुर

यामुळे जागृत व्हावा. इंग्रज हा त्राता आहे, तो उपकार कर्ता आहे, त्याच्याचाचून आमची उन्नती होणार नाही हा दुबळा, गुलामी दास्य-विचार नष्ट होऊन स्वावलंबन, स्वत्व, स्वातंत्र्य यांची ज्योत आमच्या मनात पाजळू लागली आणि आमची मनसामर्थ्ये स्वतःपुरती होऊन आमच्या कर्तृत्वाला नवं क्षेत्रात धुमारा येऊ लागला.[21]

चिपळूणकरांच्या विचार कार्याने प्रभावित होऊन टिळक-आगरकर त्यांना मिळाले व इ.स. १८८० नंतर पुण्यात चिपळूणकर-टिळक-आगरकर यांनी महान राष्ट्रीय पक्ष निर्माण केला. तथापि या महान राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार दादाभाई नौरोजी यांनीच प्रथम केला.[22] परराष्ट्राचे ढोंग करून हिंदुस्थानवर गुजराणा-या साम्राज्याच्या लोकांपेक्षा व्यापाराचा लोभ रोमरोमात भिनलेल्या, दर्प, नीतिमत्ता व मुत्सद्दीगिरी ही व्यापारी वृत्तीने व्यापलेल्या इंग्रजांच्या व्यापारी संस्कृतीचा वेदान्त त्यांनीच प्रथम उघड करून दाखविला. इंग्रजांचा लोकहिताचा व लोकसेवेचा बुरखा - फाडून त्याच्या आत दडलेल्या स्वार्थांधक राक्षसीवृत्तीचे दर्शन त्यांनीच घडविले. ब्रिटिशांच्या मायावी साम्राज्यात आपले कोट्यावधी देश बांधव दारिद्र्याने, उपासमारीने मरत आहेत व या लोकांतराच्या काळ रात्रीत आम्ही असेच घोरत पडलो तर अघोर आम्हा सर्वांचा त्यात विनाश होणार आहे याचे ज्ञान भारतीयांना त्यांनीच प्रथम करून दिले. १८७१ मध्ये विलायतेतील "ईस्ट इंडिया फिनान्स कमिटी" पुढे हिंदी जनतेचे दर माणशी वार्षिक उत्पन्न अवघे वीस रुपये आहे व हे उत्पन्न सरकार तुरुंगातील कैद्यासाठी दरमाणशी जो खर्च करते त्याहूनही कमी आहे असे त्यांनी प्रमाण सिद्ध केले.[23] हिंदुस्थानपुढील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दारिद्र्य व उपासमारीचा असून त्यावर एकच उपाय म्हणजे स्वराज्य होय या विचाराचा पुरस्कार दादाभाई नौरोजी यांनीच प्रथम केला. तसेच ब्रिटिश साम्राज्याची उत्पत्ती, स्थिती आणि विनाश ही सर्व हिंदी जनतेच्या रक्तशोषणात व तिच्या भयंकर दारिद्र्यात आहेत ही सारा-स्पष्ट मांडणी त्यांनीच प्रथम केली.[24]

सुधारणावादाचा पुरस्कार करणारे व महाराष्ट्रात नवजागृती निर्माण करु पाहणारे बहुतेक सर्व विचारवंत हे सरकारी नोकरीच्या पाशात अडकले होते. त्यामुळे त्यांच्या कार्यांना मर्यादा पडल्या होत्या. यात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, न्या. रानडे प्रभृती होते. याला एकमेव अपवाद म्हणजे महात्मा फुल्यांचा होय. म्हणजे चिपळूणकर, टिळक-आगरकर यांचा सरकारी नोकरी न करता निस्वार्थ राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण करणाऱ्या परंपरेचा पाया प्रथम महात्मा फुलेनीच महाराष्ट्रात घातला हे उघड आहे. परंतु १८७४ पासून म्हणजे चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून महाराष्ट्राच्या नव्या युगाला सुरुवात झाली हे मात्र निश्चित.

<u>निबंधमालेचे ऐतिहासिक कार्य :</u>

१८७४ साली चिपळूणकरांनी निबंधमाला सुरु करुन स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती व स्वातंत्र्याविषयी प्रीती आणि आदर निर्माण करुन पारतंत्र्याविषयी व परधर्माविषयी चीड निर्माण करण्याचे फार मोठे कार्य केले. त्यांनी आपल्या धारदार लेखणीच्या प्रभावाने तरुणांची मने काबीज करुन त्यांच्या स्वत्वाच्या भावनांना आवाहन केले. साहजिकच तरुण वर्ग फार मोठ्या प्रमाणात त्यांच्या विचाराकडे आकृष्ट झाला. विश्वव्यापी इंग्रज, त्यांची संस्कृती व इतिहास आणि भारताबरोबरच जगातील अन्य देशांवरील उत्तरोत्तर वाढणारा प्रभाव आणि सामर्थ्य चिपळूणकरांनी ओळखले होते. तरीही आधुनिक आणि पुरोगामी राष्ट्रवादाचा विचार न करता संस्कृतीनिष्ठ राष्ट्रवादाला आवाहन करुन त्या आधारे महान राष्ट्रवादाचे बीजारोपण केले. १८५० ते १८८२ या केवळ ३२ वर्षांच्या काळात १८५७ चे बंडासारखी महत्वाची घटना घडून, या घटनेचे परिणाम स्पष्ट होऊन १८८५ सालच्या कॉंग्रेस स्थापनेपर्यंतचा हा काळ म्हणजे राष्ट्रवादाच्या निर्मिती प्रक्रियेतील महत्वाचा कालखंड होय.

इंग्रजांचे सुरुवातीचे उदार व कल्याणकारी धोरण नष्ट होऊन,

त्यांनी आपले खरे दात दाखवावयास सुरुवात केली होती.[२५] माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन[२६], सर जॉन माल्कम[२७] सर चार्लस मेटकाफ किंवा सर जॉन मन्रो सारख्या मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या मुत्सद्दीपणाने व औदार्यशील धोरणाचा पुरस्कार करून संपूर्ण देशावर इंग्रजांनी अंमल बसवला असला तरी, एकदा देशाची सत्ता हाती आल्यावर त्यांनी नीतिचा अवलंब करून देशाची व जनतेची लूट करणारे त्यांचे धोरण इंग्रजांच्या सुशिक्षित व विचारवंत लोकांच्या नजरेत आल्याशिवाय राहिले नाही. इंग्रजांना मानणाऱ्यांच्या मनात सुद्धा त्यांच्याबद्दल चीड व संताप निर्माण झाला. हिंदी राज्यकर्त्यांची राज्ये पटापटा खालसा डलहौसीप्रमाणे एक मागुन एक खालसा करण्यात आल्यामुळे त्यांना सामर्थ्याची जाणीव व शहाणपणाची गरज वाटली.[२८] हिंदी संस्थानिकांची बाजू घेऊन त्यांना पुन्हा सिंहासनावर बसवून ठेवण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी सुद्धा पुरस्कार अवलंबिले.[२९] इंग्लंड सारखा औद्योगिक प्रगत पुढारलेला देश. त्यांचे व्यापारवादी धोरण आणि शेती व ग्रामोद्योग प्रधान व आम्ही भारत देश यातील संघर्ष भारतीय अर्थव्यवस्थेला अपायकारक ठरून पर्यायाने भारताची विनाशाकडे वाटचाल हे मर्म त्या काळातील विचारवंतांनी पुरते जाणले आणि त्यादृष्टीने आपल्या "निबंधमाले"च्या द्वारा लोकजागृती करण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे प्रतिसादही मिळू लागला.

**टिळक-आगरकरांचा उदय व न्यु इंग्लिश स्कूलची स्थापना :**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या इतिहासात तसेच राष्ट्रीयवादी चळवळीत क्रांतिकारी ठसा उमटवणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा जन्म २० मे १८५० रोजी पुण्यातील प्रसिद्ध "शालापत्रक" कर्ते कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे पोटी झाला. कृष्णशास्त्री वेदपुरकरांच्याकडून विष्णुशास्त्रींनी संस्कृतचे धडे घेतले. १८७१ साली पुना कॉलेजमध्ये ते बी.ए.झाले. पण तत्पूर्वीपासूनच म्हणजे १८६८ पासून विष्णुशास्त्रींनी आपल्या लेखनास "शालापत्रक"तून सुरुवात केली होती. पुढे स्वतंत्रपणे "शालापत्रक"ची

जबाबदारी स्वीकारली. १८७२ च्या प्रारंभी विद्याखात्याचे डायरेक्टर चॅटफिल्ड यांच्या शिफारशीवरून त्यांनी सरकारी हायस्कूलात शिक्षकाच्या नोकरीस प्रारंभ केला. १८७४ च्या जानेवारीत "निबंधमाले"चा पहिला अंक बाहेर पडला. पुढे १८७५ मध्ये विष्णुबुवांनी मराठी कवितेवर लिहिलेल्या निबंधमालेतील मिशन-यावरील टीका व सरकारी धोरणावर झालेले ताशेरे यांचे निमित्त होऊन "शालापत्रक" बंद झाले. पुणे हायस्कूलमधील मुख्याध्यापक म. मो. कुंटे व विष्णुशास्त्री यांचे संबंध ठीक नव्हते. निबंधमालेच्या ३० व्या अंकातील "इंग्रजी भाषा" या निबंधाचे निमित्त करून अनेक कारणांनी विष्णुशास्त्र्यांची बदली रत्नागिरीस करण्यात आली. रत्नागिरीत राहूनही त्यांनी मालेचे संपादन चालू ठेवले. १८७७ मध्ये "चित्रशाळा प्रेस" सुरू होऊन "काव्येतिहाससंग्रह" मासिकही निघू लागले होते. १८७८ मध्ये कृष्णशास्त्री वारले व पुढे सप्टेंबर १८७९ मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. यावेळी ते "किताबखाना" हे पुस्तकाचे दुकानही भागीदारीत चालवित होते.

चिपळूणकर हे सर्व उद्योग करीत असता स्वतंत्र शाळा काढण्याचा त्यांचा विचार चालू होता. यावेळी डेक्कन कॉलेजमध्ये शिकणारे समवयस्क व समान ध्येयाने प्रेरित झालेले व विष्णुशास्त्री यांच्या निबंधमालेतील राष्ट्रवादी विचाराने प्रभावीत झालेले टिळक व आगरकर यांना विष्णुशास्त्री स्वतंत्र शाळा काढताहेत याची कुणकुण लागली व ते दोघे विष्णुशास्त्र्यांकडे भेटावयास आले व त्यांनी शाळा काढण्याचा एकत्र विचार केला. तत्पूर्वी १८७६ मध्ये टिळक बी.ए. पास होऊन १८७७ ला एम.ए. ला बसून नापास झाले व एम.ए सोडून ते १८७९ मध्ये एल.एल.बी. ला बसले. आगरकर यावेळी एम्.ए.चा अभ्यास करीत होते. नंतर तिघांनी एकत्र येऊन शाळा काढण्याचा निश्चय पक्का केला. त्याप्रमाणे १ जानेवारी १८८० या दिवशी शाळेचा उद्घाटन समारंभ होऊन प्रतिष्ठित "न्यू इंग्लिश स्कूल" सुरू झाले. आगरकर एम्.ए.ला नापास झाल्याने ते एक वर्ष उशीरा शाळेत दाखल झाले.

चिपळूणकर, टिळक-आगरकर यांच्यात सुरवातीला तरी एक समान ध्येय होते आणि ते म्हणजे अज्ञानी लोकांना शहाणे करणे व त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना प्रकर्षाने निर्माण करणे-यासाठी दोनच पर्याय त्यांच्यापुढे होते. एक म्हणजे जुन्या पिढीला उपदेश करणे व दुसरा नव्या पिढीला शिक्षण देणे. पैकी पहिला मार्ग अनुसरणे हे प्रायः पालथ्या घड्यावर पाणी घालण्यासारखेच होते.[30] उलट शिक्षण संस्था काढून राष्ट्रवादी शिक्षण देऊन, राष्ट्रीय विचारांची नवीन पिढी तयार करता येईल. त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावता येईल. विष्णु - शास्त्र्यांच्या मते "विद्यार्थ्यांच्या मनात विरोधी शरी चांगली भरून देऊन, त्याच्या अभ्यासाने होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून, उत्साह उत्पन्न करतील तर शिक्षण हे ठिक न असता, सरकारीच्या पोटभरासारखे ओशाळ व लाचारीत होऊन, चार दिवस कि-हाइ करून, ज्या अरिष्टाशी राष्ट्रमाने या देशास वेरीस आणले त्याचे निर्मूलन करील व सर्वोकडून सुशिक्षित लोक त्याचे आश्रित म्हणजे शिक्षक यांचे दिव्य धाक भू-मंडलावर मिरवेल .[31]

अशा रीतीने चिपळूणकर-टिळक-आगरकरांनी पुण्याच्या बुधवार पेठेतील मोरोबादादा फडणीसांच्या वाड्यातील चौकात सुरू केलेल्या शाळेत सुरुवातीला व्यंकटेश बाळाजी करंदीकर व बाबाजी आबाजी भागवत हेही दोन तरुण शिक्षक सामील झाले. नंतर मात्र सरकारी नोकरीची मुदत पडल्याने व चिपळूणकर-टिळक-आगरकर यांच्या मधील सेवाभाव असणारी बाणीव झाल्याने त्यांनी आपला बेत बदलला व त्या कार्यापासून परावृत्त झाले. अर्थात त्यांच्याबद्दल काही अडले नाही. "न्यू-इंग्लिश स्कूल" शाळेच्या उभारणीच्या महिन्यात इतके यश लाभले की, सरकारी हायस्कूलातील विद्यार्थी व भावी विद्यार्थ्यांच्या पहिल्या पहिल्या रांगा ओस पडल्या आणि शाळेच्या मुख्याध्यापकांचा, की जे टिळक-आगरकरांना "रोमँटिक" पोरे म्हणून संबोधणाऱ्या माधवराव कुंटयांचा गर्व पुरता उतरला आणि "सरकारी मदत न घेता पुण्यातील ही उच्च शिक्षणा

काम एक माणसी असल्याने दरसाल ११ ते १२½ हजार रुपये खर्च करून पुण्याचे सरकारी हायस्कूल कां चालू ठेवावे ? असा प्रश्न सरकारी इंग्रजी अधिकारी रे.प्रि. मॅक्किन यांना पडला.[32]

टिळक-आगरकर हे चिपळूणकरांच्या राष्ट्रवादी विचाराने प्रभावित झाले होते आणि वयाने लहान असूनही शाळा काढली असली तरी या दोघांवर चिपळूणकरांचा प्रभाव कायम होता. किंबहुना पुढील आयुष्यातील या दोघांचे कार्य चिपळूणकरांच्या प्रेरणेने सुरू राहिले होते असे मात्र म्हणता येत नाही. कारण केवळ दोन अडीच वर्षे चिपळूणकरांचा सहवास त्यांना लाभला होता. त्यांच्या सहवासात फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना देशसेवेत आयुष्य घाल-विण्याचा निर्धार या दोघांनी केला होता. तसेच टिळक चरित्रकार केळकरांच्या मतेही " टिळकांनी आपली सर्व स्फूर्ती शास्त्रीबोवांकडून घेतली होती. असे मानण्याचे कोणतेच कारण नसल्याचे स्पष्ट केले आहे.[33] शिवाय चिपळूणकर अल्पायुषी ठरल्यामुळे सार्वजनिक जीवनाच्या रणांगणात प्रत्यक्ष उतरून आपले नेतृत्व दाखविण्याचा अवसर असा त्यांना मिळालाच नाही आणि राष्ट्रवादी पंथाने पुढे टिळकांच्या कुशल व प्रभावी नेतृत्वाखाली जे विजय मिळविले होते त्याचे श्रेय चिपळूणकरांपर्यंत नेऊन कितपत पोहोचविता येईल हा प्रश्न आहे.[34]

विविध विचारप्रवाह :-

१८५७ च्या उठावानंतर भारतीय व महाराष्ट्रीय राजकीय व सामाजिक जीवनात जे संक्रमण सुरू झाले होते त्यामध्ये साधारणपणे चार प्रवाह आढळतात. पैकी शूद्रातिशूद्र व उच्च वर्णीय लोकांमधील भेदभाव नष्ट होऊन लोकांनी ज्ञानी व्हावे, अंधश्रद्धा सोडून समान (आर्थिक, सामाजिक व धार्मिक) संधी मिळावी म्हणून वर्ण विरहीत पण समान धर्मीय साम्यवादी विचारसरणीचा महात्मा फुल्यांचा एक विचारप्रवाह. दुसरा संस्कृतिनिष्ठ भाषेच्या भावनेचे स्वाभि-मानजागर चिपळूणकरांचा प्रवाह. तिसरा संस्कृतिनिष्ठ व इंग्रजी राजवटीच्या आगमनाने आलेल्या पारतंत्र्याने समाजाला जे दुष्परिणाम भोगावे लागत होते ते ध्यानात घेऊन सुद्धा तिचे अपरिहार्यत्व जाणून तिचा स्वीकार करणाऱ्या न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी इ.चा विचार प्रवाह. आणि चौथा म्हणजे

शस्त्राच्या जोरावर क्रांती घडवू पाहणाऱ्या वासुदेव बळवंत फडक्यांसारख्या क्रांतिकारकांचा विचार करतात.

यापैकी विश्वबंधुत्वाची ओळख करून देणारे, जोमे तेरा पाने ही असती कृतीत आणणारे, समाजातील सामान्यांच्या उन्नतीसाठी झटणारे, मानवतेचा महान मंत्र देणारे, वृत्तीने कडक पण अंतःकरणाने मात्र निष्कपट असलेल्या कृतिशील महात्मा फुल्यांची, तत्कालीन स्वतःला सुधारणावादी, राष्ट्रवादी म्हणवून घेणाऱ्या सुशिक्षित, उच्च शिक्षित व वरच्या लोकांनी त्यांची हेटाळणीच केली. सामान्य लोकांची आस्था, शिक्षणाचा प्रभाव, शिक्षण प्रसाराची अपुरी साधने, समजून घेण्याची असमर्थता, उच्चवर्णीयांचा समाजावरील वाढता प्रभाव आणि दबाव, उच्च वर्णीयांची सुख लोलुपता, संधी साधु व बेगुमान स्वार्थी वृत्ती, सामान्य लोकांविषयी हृदयशून्य बेफिकीरीची वागणूक इ. सर्व कारणांनी हा सत्यवाद खऱ्या अर्थाने राष्ट्रवादातील महत्त्वाचा भाग असून सुद्धा दुर्लक्षित गेला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या लोकमान्य आणि वापरणाऱ्या प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या प्रचार माध्यमाद्वारे लौकिकाच्या पेढ्यावर स्वार झालेल्या मातब्बर शब्द प्रभुत्वाच्या या लेखणी कौशल्याने फुल्यांसारख्या निस्पृह, जोतीबांच्या व्यक्तीवर सतत टीकेचे प्रहार करून, उच्च वर्णीय व अल्पशिक्षित सामान्य लोकांच्यावर संस्कृतिनिष्ठ राष्ट्रवादाचा प्रभाव पाडून फुल्यांच्या कार्याला खीळ घातली. फुले हे ब्राह्मण-विरोधी, इंग्रजनिष्ठ, राष्ट्रविरोधी आहेत असाच प्रचार बुद्धीपुरस्सर करून देऊन लोकमत दुसरीकडे वळविले. विष्णुशास्त्र्यांच्या विचारसरणीत ज्ञानापेक्षा अहंगंड अधिक होती. विचारापेक्षा विकार अधिक होतात. केवळ म्हणून चिपळूणकरांचे कर्तृत्व आणि कीर्ती अफाट होती. त्यांनी आपल्या देशाभिमानी सुशिक्षित तरुणांमधील देशप्रीतीच्या भावनेला जोराची चालना दिली आणि मायभूमीच्या विमोचनासाठी त्यांना उभे केले हे खरे पण त्यांच्या लेखनातील विचारांचा भर भारतातील मध्यकालीन वैभवाचे पोवाडे गाण्याकडे विशेष होता.[35]

फुल्यांची ब्राह्मण-द्वेषक, ब्राह्मणद्वेषी, सत्यधर्म संस्थापक अशी हेटाळणी[36] करून स्वतः ब्रिटीश साम्राज्यवादी सत्तेच्या या अत्याचाराच्या सर्वांविरुद्ध हुरूप

म्हटले, " आमच्या शूद्र प्रतिमाध्यानी नेहमी ध्यानांत ठेवावे की, चित्पावन हे चित्पावनातून उत्पन्न झालेले असोत किंवा इराणातून आलेले असोत, त्यांचे नैतिक गुण हे यापूर्वी प्रकट झाले व अजूनही होत आहेत ते उपजत" गुलाम-गिरीयांनी " व ब्राम्हण "बौद्धिकदारांनी" ही व्यवस्थाही कधी होणारे नव्हेत". ब्राम्हण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे, ती ही की ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साहाय्याशिवाय इतर जातीत ज्ञानाचा लाभ होण्याचा दुसरा कुठलाही मार्ग नाही"[27] अशा विचाराने पुढे चाललेल्या फुल्यांच्या या प्रवाहाला बुद्धीपुरस्सर नामोहरम करण्याचा प्रयत्न आजही, चित्पावन ब्राम्हणांकडून केला जातो आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे गतवर्षी "लोकमत" मध्ये डॉ. बाळ गांगल यांनी आपल्या बाळबुद्धीचे तेज पाजळत, महात्मा फुल्यांच्या कार्यावर गरळ ओकून "हा कसला महात्मा?" हा लेख लिहिला होता. माणसाला मर्यादा असतात पण केवळ कनिष्ठ असा वाद निर्माण करून सत्यशोधकांच्याकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले. कृति-उक्तीमधील फरक दाखवून लोकहितवादी सारख्या समाज-सुधारकाला सुद्धा या शब्दप्रभूंनी नामोहरम केले. त्यावेळी टीकाकारांनी व पुरोगामी विचारांचा "शतपत्रे" कर्ता सुद्धा या सनातन्यापुढे नामोहरम होऊन हतबल झाला. शतपत्रातील टीका सहन न होऊन, प्रस्थापितांच्या स्थानाला हादरे बसू लागल्याची जाणीव होऊन किंवा लोकहितवादींची झालेली उन्नती त्यांचे समाजातील स्थान याबद्दलची असूया निर्माण होऊन तर या प्रतिगाम्यांच्या मनात द्वेष उत्पन्न झाला नसेल ?

भारतातील ब्राम्हणेतरामध्ये शिक्षण प्रसाराचे श्रेय ख्रिश्चनांना द्यावे लागेल. त्यांनी भारतात शिक्षण सर्वांना खुले केले. अगोदर ज्ञान-भांडाराच्या किल्ल्या ब्राम्हणांच्या कंबरेला लटकत राहिल्या.[28] यानंतर थोड्याच दिवसांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा वारसा टिळकांकडे आला. त्यांनी समाजसुधारकांना हाणून पाडण्यासाठी चिपळूण-करांनी अनुसरलेल्या टीकापद्धतीचीच परंपरा चालू ठेवली.[29] एवढेच काय परंतु सुधारकाग्रणी म्हणून नावाजलेल्या आगरकरांनीही महात्मा फुल्यांच्या कार्याची दखलही घेतली नाही. ही आश्चर्याची बाब नसून, ती तत्कालीन उच्चवर्णीयांच्या परंपरेला धरूनच असावी असे खेदाने म्हणावे लागते. रा.के. लेले यांनी रविवार ९ ऑक्टो. १९८८ च्या महाराष्ट्र टाइम्स

या लेखिकात "ऐतिहासिक सुधारक चळवळी" या लेखात हेच मत व्यक्त केल्याचे दिसते ते म्हणतात, "आगरकरांच्या लिखाणात एक अतीव विशेष जाणवतो व तो म्हणजे महात्मा जोतीराव फुले व त्यांच्या चळवळी या आगरकरांच्या लेखनात उल्लेख आढळत नाही व त्यांची कोठे नोंदही घेतल्याचे दिसत नाही. आगरकर "केसरी" चे संपादक असतांना "केसरीत जोतीरावांची बाजू घेण्यात येत होती. पण ती विष्णुशास्त्री चिपळूण-करांच्या निबंधमालेतील लेखनापेक्षा निराळी नव्हती" "ज्या अर्थी जोतीबांचा साधा उल्लेख करण्याचे टाळलेले आहे, एकीकडे हडपसर व दुसरीकडे त्यांचे नाव त्यांच्या पुढे लीला होत, त्या अर्थी आपण "शूद्र" असेच समजून घेण्यास आम्ही तयार नाही. स्वामींच्या अर्थ समाज -प्रमाणे त्यांचा केवळ आवश्यक विस्तार होईल व सत्यसमाज मंदिराच्या आकाराची जोतीरावांचा संस्थापकी पुतळा त्यांच्या सुरूप वाराचा स्मारक म्हणून स्थापणा वाईल, तेंव्हा त्यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी विचार करता येईल![40] आता आंबेडकरयुक्त व कृतिशील दृष्टीने फुल्यांच्याबद्दल विचार -केले करणाऱ्या चिपळूणकरांनी जोतीरावांसंबंधी व्यक्त केलेले धोरण केवळ व्यक्तिगत मात्र असून तत्वकुटील असल्याचे दिसते आहे. जोतीरावांची व्याख्या व त्यांच्याबद्दल स्पष्ट नसले तरी त्यांचे पुतळे आज अनेक ठिकाणी त्यांची स्मरणार्थी व्यक्त करीत आहेत. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाचे पुतळे मात्र कुंपणाबाहेर शोभून पहावे लागतील.[41] आणि याचाही विचार करत मांडला तरुणांनी पडू देऊ नये हे उत्तम!

राष्ट्रीय जागृतीच्या आणि स्वातंत्र्याकांक्षेच्या दृष्टीने फुल्यांची ही चळवळ इष्ट होती. कारण ब्राह्मण कुंभार होते. बाकीचा समाज बहुजन होता. तो ब्राह्मणांच्या दास्यातून मुक्त झाल्याखेरीज इंग्रजांच्या दास्यावरचा विचार करणे शक्यच नव्हते. फुल्यांच्या चळवळीचे महत्त्व, तिची ऐतिहासिक अपरिहार्यता व इष्टता चिपळूणकरांच्या काय पण रानडे प्रभृती सुधारणावादी पुढाऱ्यांच्याही ध्यानात आली नव्हती. उलट या सुधारणावादी लोकांनी फुल्यांचा केलेला उपहास व त्यामुळे ब्राह्मणेतरांच्यात निर्माण झालेली कटुता यामुळे मराठी मनांचे जे अपरिमित

नुकसान झाले आहे. त्याचे मोजमाप करता येणार नाही.[४२]

वर सांगितलेल्या व विचारवंतांची कुणाची विचार हा अशा पद्धतीचे झालेला. भारतीय इस्लामवर विश्वास ठेवून उदारमत प्रीती कार्य कर वहाणाऱ्या बाजूंच्या स्वतंत्र महंमदांच्या प्रतिकारी विचारप्रवाहाची अजूनही यावेळपर्यंत दखल घेतली गेलेली नाही. महंमदांच्या टीकाकारांना ज्योतीरावांनी ज्या-या पुरवल्या असल्या तरी अलीकडेच दलवाईंनी "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात" त्यांनी महंमदांचा उल्लेख दरवडेखोर किंवा लुटारू असा केला आहे. त्याबाबतीत संघ नेत्यांनी पळे यांच्या भाषेत साररूप मत प्रदर्शित केले आहे असे दिसते. विवेकानंदांसारख्या विचारवंतांनी महंमदांना पैगंबर म्हटले तर टिळक यांनी त्यांना धार्मिक क्रांतिकारक म्हटले. दुसऱ्या विवेक त्यांनीही आणि पुस्तकांनी त्यांना प्रमाण दिले आहे. हा धार्मिक संकेत आहे.[४३] उलट महंमदांचा प्रतिकारक म्हणून उदोउदो करणाऱ्यांनी, त्यांच्या पूर्वजांनीही महंमदांना नोकरीच्या भीतीने, ईश्वराच्या भितीने आणि समाजातील आपल्या उच्च दर्जा पोचवू नये म्हणून सारे लिहिली नव्हती तर गुन्हेगार म्हणून इंग्रजांनी ठरवलेल्या व समाजाने बहिष्कृत ठरविलेल्या समाजाशी भारतातील नेत्यांनीच साथ दिली होती हेही ध्यानात घ्यावे. महंमदांचा विचार प्रवाह पुढारी मांडणारा.

सांस्कृतिक राष्ट्रवादी प्रवाहाचा प्रभाव:

भारतीय लोकांचा प्रवाह प्रभावीपणे कार्यरत राहील. आणि ते म्हणजे न्याय. टिळके यांचा समन्वयवादी व विवेकानंदांचा पर्यायिक सांस्कृतिक राष्ट्रवादी. त्यातही विवेकानंदांचा विचार प्रवाह प्रभावी ठरला. विचारांची व्याप्ती, भारत बुद्धीमत्ता असलेले न्याय. टिळके केवळ कायदे पंडित आणि हायकोर्ट न्यायाधिकारी नव्हते. तर ते धर्माच्या प्रांताचे अभ्यासक, इतिहासकार विचारवंत आणि तत्त्वचिंतकही होते. पण ते राजकारणी मात्र नव्हते. ही एक अशी उणीव मोठी होती कारण ते राजकारणी असते तर त्यांचे पुढे झालेच नसते. अशांत ते राजकारणी नसले तरी राजकीय तत्त्वज्ञानाचे सखोल अभ्यासक होते. त्यांनी ते सिद्धांत अभ्यासपूर्वक

डॉ. आंबेडकरांनीसुद्धा निषेध.[४४] दिला असला तरी, त्यांनी स्वतःच्या विधवा बहिणीच्या लग्नाच्या वेळी आढेवेढे घेतले. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी स्वतःच बत्तिसाव्या वर्षी ११ वर्षांच्या मुलीशी विवाह केला आणि ही बातमी ऐकून सर्व सुधारकांनी आपली तोंडे लपविली.[४५] इब्सेनच्या मताप्रमाणे "कृतीत उतरले नाहीतर सद्विचारांचे मूल्य हे सुंदर स्वप्नापेक्षा अधिक नाही."[४६] या तत्त्वानुसार चिपळूणकर टिळकांसारख्यांनी न्या. रानड्यांवर टीकेची झोड उठवली. वास्तविक चिपळूणकर टिळकां-टिळकांसारख्यांनी रानड्यांच्यावर केलेली टीका ही कदाचित त्यांचे सरकारी दरबारी असलेले वजन व लोकांच्यामधील त्यांचे असलेले आदराचे स्थान पाहून केवळ मत्सरापोटीच केलेली असावी. (पहा: विश्राम बेडेकर: टिळक-आगरकर (नाटक) १ आ. १९८० अंक-२, पृ-४७) परिणामी हा प्रवाह निष्प्रभ झाला आणि चिपळूणकरांचा धर्मपरायण, संस्कृतिनिष्ठ, राष्ट्रवादी प्रवाह प्रभावी बनला. अर्थात लोकनायकत्वाचे श्रेय चिपळूणकरांच्या अंगी नाही म्हटले तरी होतेच.[४७]

स्थूलमानाने हे चार वेगवेगळे प्रवाह मानले तरी व्यक्तिशः, अज्ञानी व बहुजन समाजाला समाज ज्ञानी करून राष्ट्रीय प्रवाहात जनसामान्यांना सामील करून घेणे हे या प्रवाहाच्या सुधारकी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या होते. हे साधण्यासाठी ते आपापल्या परीने कार्यरत होते. यात चिपळूणकरांचा विचार प्रवाह प्रभावी ठरला हे मात्र निःसंशय.

चिपळूणकर, टिळक, आगरकर हे सनातनवादी, धर्मपरायवादी राष्ट्रवादी होते किंवा नव्हते हा वाद महत्त्वाचा नाही. त्यांना दिलेल्या विशेषणावरून त्यांचे मूल्यमापनही करावयाचे नाही आणि या वादात जायचेही कारण नाही पण व्यक्ति स्वातंत्र्याचा उद्घोष करणारी, प्रयत्नाने मानवी हित साधून प्रत्येकाची मानवाची प्रगती होऊन ऐहिक उन्नति व्हावी असा विचारसरणीच्या या नवीन प्रतिक्रियेच्या झोंबी राजवटीत सामावलेल्या ढवळून निघाले. अनेक नवी बंड उठल्याने, जागतिक जीवनातील विविध प्रवाहांचे अभ्यासपूर्ण परीक्षण करावे आणि आपल्या प्रकृतीला व परिस्थितीला

मानवीन जरी, "विवेके क्रिया आपुली पालटावी" मात्र स्वतःची नि राष्ट्राची प्रतिष्ठा वाढविण्या बाबतच्या आग्रहीपणे व तार्किक तत्त्वावर तोंडावरची असा टाहो महाराष्ट्राच्या भल्यासाठी फोडणाऱ्या, गोपाळ गणेश आगरकर यांचे चरित्र अभ्यासणे या शोधनिबंधाच्या दृष्टीने योग्य ठरेल. सुधारक लोकवादाने अन्यायाचे परिमार्जन, राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात कसे करावे याचे धडे देणाऱ्या चारित्र्य संपन्न, निर्भय आणि तितकाच कोमल वृत्तीच्या सुधारकाचे विविधांगी दर्शन होऊन, विद्यार्थ्याने आयुष्य घडविण्याची प्रेरणा, महाराष्ट्रीय व पर्यायाने भारतीय तरुणांना त्यांच्या अभ्यास अभ्यासोत्तरी आगरकरांचे चरित्र व चारित्र्य दिल्याशिवाय राहणार नाही म्हणून पुढील प्रकरणात सुधार-कांचा महत्त्व, स्त्रियांचा उद्धारकर्ता, व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्गाता, बुद्धी प्रामाण्याचा आग्रह धरणाऱ्या गोपाळ गणेश आगरकर या महान्कृत्या व्यक्तिमत्त्वाचा संक्षिप्त परिचय करून दिला आहे. या चरित्रात आगरकरांचे विचारांचाही धोरणात्मक मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

• • •

**संदर्भ**

१. रा.श्री जोग(संपा.) : मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड ४, पृ.५

२. श्री रा.टिकेकर(संपा.): लोकहितवादींची शतपत्रे (दु.आ.), पृ.११

३. अ.का.प्रियोळकर(संपा.): रा.ब.दादोबा पांडुरंग आत्मचरित्र-चरित्र
(१ आ.) १९४७ पृ.१५९

४. श्री.रा.टिकेकर(संपा.): लोकहितवादींची शतपत्रे(दु.आ.) पृ.१२

५. तत्रैव, पृ.१४ :

६. तत्रैव.पृ.१४ :

७. शं.द.जावडेकर(संपा.): आधुनिक भारत, पृ.९

८. तत्रैव, पृ.२२ :

९. अ.का.प्रियोळकर (संपा.) : रा.ब.दादोबा पांडुरंग: आत्मचरित्र-चरित्र
(१ आ.) तळटीप-१ पृ-१७७

१०. शं.द.जावडेकर : आधुनिक भारत: पृ.७

११. तत्रैव, पृ.२० :

१२. रा.श्री जोग(संपा.) : मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४,पृ.२२

१३. श्री.रा.टिकेकर : लोकहितवादींची शतपत्रे: (दु.आ.)
प्रस्तावना, पृ:११

१४. शं.द.जावडेकर : आधुनिक भारत (दु.आ.) पृ.१०९

१५. रेव्ह. बाबा पदमनजी : अरुणोदय (२री आ.) पृ.९४

१६. रा.श्री जोग : मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड-४, पृ.७४

१७. तत्रैव पृ.७४ :

१८. मालशे, कीर (संपा.) : म.फुले समग्र वाङ्मय, (१ आ.)१९६९
प्रस्तावना, ल. भगवानदास जोशी, पृ.बारा

१९. गं.बा.सरदार (संपा.) : महाराष्ट्र जीवन (१ आ.) खंड-१
परचुरे प्रकाशन, मुंबई, राजकारण:
पु.ग.सहस्रबुद्धे, (पृ.७०२)

२०. तत्रैव पृ.७०३ :

२१. तत्रैव पृ.७०४ :

२२. शं.द.जावडेकर : आधुनिक भारत (२ आ.) पृ.१२२

२३. तत्रैव पृ ११६ :

२४. तत्रैव पृ.१२२ :

२५. अ.का.प्रियोळकर (संपा.): रा.ब.दादोबा पांडुरंग आत्मचरित्र व चरित्र
(१ आ.) पृ २२८

२६. तत्रैव पृ.७९-८० :
(एलफिन्स्टनसाहेब स्वदेशी निघाले असता, या देशीय सरदार, व्यापारी सावकार, यांनी त्याचे नांव या देशात राहावे म्हणून त्यांच्या नांवाने मोठे विद्यालय काढावे या करिता एक मोठी टीप (वर्गणीची यादी) भरून तयार झाली होती. तीत सुमारे २ लक्ष रुपये भरलेले होते.)

२७. तत्रैव पृ.७८ :
(सर जॉन माल्कम हे मोठे धोरणी व दीर्घ दृष्टीचे पुरुष होते, त्यांच्या हातून बहुतकरून या हिंदुस्तानात व माळव्यात मोठमोठाली राजकारणे व बंदोबस्ताची कामे केली होती.)

२८. मा.म.बुद्धीसागर : चिपळूणकर लेखसंग्रह (साहित्य अकादमी) १ आ. प्रस्तावना, पृ. १०

२९. तत्रैव पृ. १० :

३०. न. चिं. केळकर : लो. टिळक यांचे चरित्र (१ आ.) खंड १ पृ. ९८

३१. तत्रैव पृ. ९९ :

३२. तत्रैव पृ. १०७ :

३३. तत्रैव पृ. १०१ :

३४. मा.म.बुद्धीसागर : चिपळूणकर लेख संग्रह १ आ. प्रस्तावना, पृ १५.

३५. धनंजय कीर : म.जो.फुले (चरित्र) (१ आ.) पृ. १६६

३६. धनंजय कीर : तत्रैव पृ. १६८

३७. तत्रैव पृ. १६२ :

३८. तत्रैव पृ. १७१ :

३९. तत्रैव पृ. १७२ :

४०. तत्रैव पृ. १६९ :

४१. तत्रैव पृ. १७१ :

४२. श्री. म. कन्हट्टी : टिळक आणि आगरकर, विहार मुद्रण १९६१ पृ. ४७

४३. धनंजय कीर : म.जोतीराव फुले (चरित्र) १ आ. पृ. १७८

४४. ग.मा.गर्गे : "न्या. रानडे आणि डॉ. आंबेडकर (लेख)" दै. महाराष्ट्र टाईम्स रविवार पुरवणी दि. २७ मार्च १९८८

४५. धनंजय कीर : म. जो. फुले (चरित्र) ३ आ., पृ. १४८

४६. तत्रैव पृ १५७ :

४७. मा. ग. बुद्धीसागर : चिपळूणकर लेखसंग्रह (साहित्य अकादमी) प्रस्तावना पृ. १०

. . .

9584
A